महाराष्ट्र शासन
गृहनिर्माण विभाग
मंत्रालय, ३ रा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.

दूरध्वनी क्र. ०२२-२२७९ ३६९६
ई-मेल: gnp.housing@maharashtra.gov.in

क्रमांक:- संकीर्ण-२०२०/प्र.क्र.३४६/गृनिप दिनांक:- ०८ जानेवारी, २०२१

प्रति,

| | |
|---|---|
| १) अपर मुख्य सचिव (गृह ),<br>गृह विभाग,<br>मंत्रालय, मुंबई-४०० ३२ | २) अपर मुख्य सचिव( महसूल),<br>महसूल व वन विभाग ,<br>मंत्रालय, मुंबई-४०० ०३२. |
| ३) उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण,<br>गृहनिर्माण भवन, वांद्रे (पू.), मुंबई-४०० ०५१ | ४) पोलीस आयुक्त,<br>मुबई पोलीस,<br>मुख्य इमारत, सी. पी. ऑफीस,<br>डॉ. डी. एन. रोड, मुंबई - ४०० ००१. |
| ५) मुख्य अधिकारी,<br>मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ ,<br>गृहनिर्माण भवन, वांद्रे (पू.) मुंबई-४०० ०५१ | |

विषय :- बी.डी.डी पुनर्वसन प्रकल्पाबाब मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली दि.१८.१२.२०२० रोजी झालेल्या आढावा बैठकीचे इतिवृत्त.

आदरणीय महोदय,

बी.डी.डी पुनर्वसन प्रकल्पाबाबत मा. मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली दि.१८.१२.२०२० रोजी झालेल्या आढावा बैठकीच्या इतिवृताची प्रत यासोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

सदरहू इतिवृत्ताच्या अनुषंगाने प्रचलित नियमातील तरतुदीनुसार आपल्याशी संबंधित मुद्द्यांबाबत उचित कार्यवाही तात्काळ करण्यात यावी , ही विनंती.

आपला,

(मुं.उ.भरोसे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

सोबत :- वरीलप्रमाणे

प्रत :-

1) मा.मंत्री(गृहनिर्माण) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
२) अपर मुख्य सचिव (मुख्यमंत्री सचिवालय), यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई

३) पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य,छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,कुलाबा, मुंबई -००१

४) प्रधान सचिव(गृहनिर्माण) यांचे स्वीय सहायक,गृहनिर्माण विभाग,मंत्रालय,मुंबई

५) उप सचिव (गृनिप), गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, मुंबई

## मा.मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि. १८.१२.२०२० रोजी झालेल्या बी.डी.डी. पुनर्वसन प्रकल्पाबाबत उच्चस्तरीय समितीच्या दुस-या बैठकीचे इतिवृत्त

बी.डी.डी चाळ पुनर्विकास प्रकल्प गतीमान करण्याच्या दृष्टीने गृहनिर्माण विभागाच्या दि.१९.०८.२०१९ व दि.०३.०२.२०२० रोजीच्या शासन निर्णयांन्वये मा .मुख्यमंत्री महोदय यांच्या अध्यक्षतेखाली व मा .मंत्री(गृहनिर्माण) यांच्या सह अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या बी .डी.डी. उच्चस्तरीय समितीची दुसरी बैठक दि. १८.१२.२०२० रोजी वर्षा निवासस्थान येथे आयोजित करण्यात आली होती.
सदरील बैठकीस खालीलप्रमाणे लोक प्रतिनिधी व अधिकारी उपस्थित होते:-

१) मा. गृहनिर्माण मंत्री, महाराष्ट्र राज्य
२) मा. पर्यटन व पर्यावरण मंत्री, महाराष्ट्र राज्य
३) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
४) प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र राज्य
५) श्री अजोय मेहता, मा. मुख्यमंत्र्यांचे मुख्य सल्लागार
६) श्री. आशिषकुमार सिंह, मा. मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव
७) उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी,महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण.
८) मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

सदरील बैठकीमध्ये बीडीडी चाळ वरळी पुनर्विकास प्रकल्प गतीमान करण्याच्या दृष्टीकोनातून प्रचलीत शासकीय धोरणात आवश्यक बदल सुचविण्याबाबत व प्रकल्प जागेवरील अडचणी दूर करण्यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

सदरहू बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या मुद्द्यांबाबत मा .मुख्यमंत्री महोदयांनी पुढीलप्रमाणे निर्देश दिलेले आहेत:-

| अ. क्र | मा. लोकप्रतिनिधीनी उपस्थित केलेले मुद्दे | बैठकीत झालेली चर्चा | मा. मुख्यमंत्री महोदयांचे निर्देश | संबधित विभाग |
|---|---|---|---|---|
| १. | वरळी प्रकल्पातील मोकळ्या जागेवर संक्रमण इमारती ऐवजी पुनर्वसन इमारत बांधणे | पोलिस मैदान व मडकेबुवा मैदान येथील मोकळ्या जागेवर २ संक्रमण इमारतीचे (१३६४ संक्रमण गाळे) बांधकाम प्रगतीपथावर आहे. सध्या पाईल फाऊंडेशनचे काम पुर्ण झालेले आहे . या जागेवर पुनर्वसन इमारती बांधण्यात यावीत असे मा . लोकप्रतिनिधीनी सुचविले. | या तिन्ही मुद्दयांबाबत सखोल अभ्यास करुन सविस्तर अहवाल उच्चस्तरीय समितीस <u>१० जानेवारी २०२१ पर्यत</u> सादर करण्यासाठी खालील समिती गठीत करण्यात यावी.<br>१. उपाध्यक्ष तथा मु.का.अ. (अध्यक्ष)<br>२. सचिव, (रस्ते) सार्वजनिक बांधकाम विभाग (सदस्य)<br>३. मुख्य अधिकारी, | म्हाडा व गृहनिर्माण विभाग |
| २. | पुनर्वसन इमारतीतील ३ Basement पार्किग रद्द करावी व बहुमजली पुनर्वसन इमारत बांधण्यात यावी व पार्किंगसाठी | पुनर्वसन इमारत तळ + २२ मजल्याऐवजी बहुमजली बांधणे शक्य आहे काय ? याबाबत पडताळणी | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | स्वतंत्र इमारत बांधण्यात यावी. | करण्याबाबत बैठकीत सुचना करण्यात आली. तसेच सदरील बदलमुळे प्रकल्प बांधकामामध्ये कंत्राटदारा समवेत झालेल्या नोंदणीकृत कंत्राटातील तरतूदीमध्ये तसेच वास्तूशास्त्रज्ञ व सल्लागार व प्रकल्प संमत्रक यांच्या कंत्राटातील तरतूदीमध्ये कशाप्रकारचे बदल होणार आहे व यामुळे संरचनेमध्ये कोणता बदल होणार आहे, प्रकल्प खर्चामध्ये काय बदल होणार आहे आणि कंत्राटातील प्रस्तावित बदल कायदेशीर दृष्टया शासनास अडचणीचे ठरणार नाही , याबाबत सविस्तार अभ्यास करणे आवश्यक असल्याचे मत मा. गृहनिर्माण मंत्री महोदयांनी बैठकीवेळी नोंदविले. | मुंबई मंडळ (सदस्य सचिव) | |
| ३. | बीडीडी चाळीतील अनधिकृत गाळेहस्तांतरण करण्यास असलेली प्रचलित कालमर्यादा दि. २८/०६/२०१७ पुढे वाढविण्यात यावी. | दि. २४/०४/२०१८ रोजीच्या शासन निर्णयामध्ये अनधिकृत गाळे हस्तांतरणासाठी दि. २८/०६/२०१७ ही काल मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. यामधील काही प्रकरणात लाचलूचपत प्रतिबंधक विभागाकडे चौकशी सुरु आहे.<br>सदरील कालमर्यादा वाढविण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीकडून व भाडेकरुंकडून मागणी होत आहे | | |
| ४ | बीडीडी चाळीतील भाडेकरुंची पात्रता संचालक, बीडीडी चाळी यांचे मार्फत निश्चित करण्यात यावी. | बीडीडी चाळींबाबत मिळकत व्यवस्थापकीय कामकाज संचालक, बीडीडी चाळीमार्फत पाहिले जाते व चाळीतील भाडेकरुंबाबत | पात्रता कार्यवाही गतीमान होण्याच्या दृष्टीकोनातून उपजिल्हाधिकारी ऐवजी संचालक, | म्हाडा व गृहनिर्माण विभाग |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | अद्ययावत नोंद संचालक, बीडीडी चाळीत कार्यालयाकडे उपलब्ध आहे. त्यामुळे पात्रता कार्यवाही गतीमान होण्याच्या दृष्टीकोनातून उपजिल्हाधिकारी ऐवजी संचालक, बीडीडी चाळी यांना बीडीडी चाळीतील भाडेकरुंची पात्रता निश्चित करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून नियुक्त करणे आवश्यक आहे अशी चर्चा झाली. | बीडीडी चाळी यांना बीडीडी चाळीतील भाडेकरुंची पात्रता निश्चित करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून नियुक्त करावे. तसेच, चाळीबाहेरील बांधकामाची पात्रता पूर्वीप्रमाणेच उपजिल्हाधिकारी यांचे मार्फत निश्चित करण्यात यावी. | |
| ५ | बीडीडी चाळीतील अनिवासी गाळयांना सध्याचे क्षेत्रफळ (१६० चौ. फूट) पुनर्वसनासाठी अनुज्ञेय आहे. त्याऐवजी त्यांना ३०० चौ. फूट चटई क्षेत्रफळ पुनर्वसनासाठी अनुज्ञेय करण्यात यावे. | या प्रकरणी म्हाडाने गृहनिर्माण विभागास दि. २१.०२.२०१९ रोजीच्या पत्रान्वये अहवाल सादर केला आहे. | याबाबत त्वरीत निर्णय घेण्यात यावा. | म्हाडा व गृहनिर्माण विभाग |
| ६ | पुनर्वसन सदनिकेचा करारनामा नोंदणीकृत करण्यासाठी रु. १००/- प्रती सदनिका इतका मुद्रांक / नोंदणी शुल्क अनुज्ञेय करावा | या प्रकरणी म्हाडाने व गृहनिर्माण विभागाने महसूल विभागास प्रस्ताव सादर केला आहे. | याबाबत त्वरीत निर्णय घेण्यात यावा. | महसुल विभाग |
| ७ | बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्प गतीमान होण्यासाठी स्वतंत्र कक्ष म्हाडाने स्थापित करावा. | याबाबत चा प्रस्ताव सादर करण्याबाबत म्हाडास निर्देश देण्यात आले. | सदरील कक्ष त्वरीत स्थापन होण्याबाबत कार्यवाही व्हावी. | म्हाडा व गृहनिर्माण विभाग |
| ८ | म्हाडाकडे संक्रमण गाळे उपलब्ध नसल्यास भाडेकरुंना संक्रमण गाळ्याचे भाडे म्हाडामार्फत देण्यात यावे. | भाडेकरुंना प्रति माह रु. २०,०००/- ते रु. २२,०००/- भाडे म्हाडामार्फत देण्यात यावे. जेणेकरुन संक्रमण गाळ्या अभावी भाडेकरु स्थलांतरीत होण्यास अडचण | म्हाडाकडे संक्रमण गाळे उपलब्ध नसल्यास भाडेकरुंना प्रकल्प अमंलबजावणीदरम्यान भाडेकरुंना स्थलांतरीत | म्हाडा |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | होणार नाही. | होण्यासाठी प्रति माह रु. २२,०००/- भाडे देण्यात यावे. | |
| ९ | प्रकल्पातील पोलिस सेवा निवासस्थाने रिक्त होण्याबाबत कार्यवाही पोलिस विभागाने करावी. | म्हाडाने पोलिस विभागास आवश्यक संक्रमण गाळे उपलब्ध करुन दयावे व सदरील गाळे ताब्यात घेवून पोलिस विभागाने सेवानिवास स्थानातील पोलिस कर्मचाऱ्यांना स्थलांतरीत करावे, असे निर्देश यापूर्वीच देण्यात आले आहेत. परंतु संक्रमण गाळे ताब्यात घेवूनही पोलिस विभागाने पोलिस कर्मचाऱ्यांना संक्रमण गाळ्यात स्थलांतरीत केले नाही व यामूळे प्रकल्प अंमलबजावणीत बाधा उत्पन्न होत आहे. | पोलिस विभागास आवश्यक संक्रमण गाळे उपलब्ध करुन दयावे व सदरील गाळे ताब्यात घेवून पोलिस विभागाने सेवानिवास स्थानातील पोलिस कर्मचाऱ्यांना त्वरीत स्थलांतरीत करावे. | गृह विभाग, मुंबई पोलिस |
| १० | बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पामध्ये उपलब्ध होणारे विक्री योग्य गाळे प्रचलित बाजार भावाप्रमाणे विकण्यास म्हाडास परवानगी मिळावी व सदरील वितरण/ विक्री बाबत खाजगी संस्थेमार्फत कार्यवाही करुन घेण्यास म्हाडास परवानगी मिळावी. | सदरील प्रकल्पात उपलब्ध होणारे विक्री योग्य गाळ्यांचा दर म्हाडाच्या प्रचलित धोरणानुसार बाजार भावापेक्षा कमी राहणार आहे. त्यामुळे, सदरील गाळे बाजार भावाप्रमाणे विकण्यास व सदरील कार्यवाही खाजगी संस्थेमार्फत करण्यास म्हाडास परवानगी आवश्यक आहे. | या प्रकरणी म्हाडाने सविस्तर प्रस्ताव शासनास निर्णयार्थ सादर करावा व तद्नंतर प्रस्ताव मान्य करण्याबाबत कार्यवाही व्हावी. | म्हाडा, गृहनिर्माण विभाग |

तद्नंतर सर्वांचे आभार मानून बैठक समाप्त झाली.

***************